# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
# (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाचा इंडो जर्मन टुल रुमशी सामंजस्य करार
## रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची विद्यार्थ्यांना संधी
## उपयोजित परमाणू व एल.एल.एल. विभागाचा उपक्रम

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व एम.एस.एम.ई. मंत्रालय, अ गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया सोसायटी अंतर्गत औरंगाबाद येथील इंडो जर्मन टुल रुम यांच्यात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सामंजस्य करार झाला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखालील कार्यक्रमात कुलसचिव डॉ. अजय देशमुख व इंडो जर्मनचे टुल रुमचे व्यवस्थापकीय संचालक इंजि.एच.डी. कापसे यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्यात. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, व्य.प. सदस्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ.एस.के. ओमनवार, अधिष्ठाता डॉ.सौ. स्मिता देशमुख, डॉ.डी.डब्ल्यू. निचित, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विभागप्रमुख, अधिकारी, इंडो जर्मनचे बेलूरकर उपस्थित होते.

सामंजस्य करारप्रसंगी माहिती देतांना एच.डी. कापसे म्हणाले, संस्थेने कौशल्य विकासावर आधारित उद्योगांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम सुरु केले असून ते पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होत आहे. महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर विद्यापीठांमध्ये अशाप्रकारचे अभ्यासक्रम सुरु झाले आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात कौशल्य विकासावर आधारित रोजगारक्षम अभ्यासक्रम या कराराच्या निमित्ताने उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त रोजगाराच्या संधी हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर निश्चितच मिळू शकणार आहे. शॉर्टटर्म आणि मध्यम कालावधीच्या अभ्यासक्रमामध्ये देशभरातील विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम सुरु केले जातात, सहभागींना प्रशिक्षण दिल्या जाते, त्यामुळे उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावेत, म्हणून विद्यापीठाने हे अभ्याक्रम सुरु करण्यासाठी केलेला करार महत्वपूर्ण ठरणार आहे. याप्रसंगी त्यांनी सुरु करावयाच्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती दिली.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर मार्गदर्शनात म्हणाले, पारंपारिक शिक्षण पद्धतीच्या बाहेर जावून कार्य करण्याची गरज आहे. आता शिक्षकांचे नव्हे, तर विद्यार्थ्यांचे दिवस आले आहेत. विद्यार्थ्यांना काय शिकायचे हे महत्वाचे असून त्याला आवश्यक असणारे विविध अभ्यासक्रम इंडो जर्मनच्या माध्यमातून सुरु करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करुन विद्यार्थ्यांच्या हितासाठी जास्तीतजास्त योजना सुरु करण्याचा मानस व्यक्त केला.

पाहुण्यांचे पुस्तक देवून स्वागत करुन आभार कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी मानले. प्रास्ताविक व संचालन उपयोजित परमाणू विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय डुडूल यांनी केले, माहिती देतांना ते म्हणाले, शैक्षणिक सत्र २०१८ पासून हे अभ्यासक्रम उपयोजित परमाणू विभाग आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून सुरु होणार आहे. जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपयोजित परमाणू विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय डुडूल व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　　　　दि. ०१/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी